कागल शहरातील तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत तसेच अनुदान वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्रमांक: रासयो २००७/६८६/प्र.क्र. ६०/२००६/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २५ सप्टेंबर, २००७.

वाचा:- १) वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५१/ ०७/ व्यय-१६ दि.२.३.२००७
२) कागल नगरपरिषदेचे पत्र क्र.जावक ३११/२००७-२००८ दि.१२ जून २००७

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत योजनेत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारणपणे खालील मुख्य कामांचा समावेश होतो.

१. तलावाच्या पाण्याचे प्रदुषण करणारे स्त्रोत निश्चित करून प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.
२. तलावात साचलेला अनावश्यक घातक व ऑरगॅनीक गाळ काढणे.
३. तलावाची गुणवत्ता टिकविण्याकरीता, तलावाच्या पाणथळ क्षेत्राची धुप रोखण्यासाठी उपाययोजना करणे
४. तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनंस्पती नष्ट करून त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपायोजना करणे.
५. तलावांतर्गत जैविक प्रक्रीयेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे.
६. किनारा सौदर्यीकरण, हरीत पट्टा विकसीत करणे, कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौकाविहार,कमी किमतीची स्वच्छतागृहे इत्यादी.
७. जनसहभाग व जनजागृतीसाठी कार्यक्रम तसेच प्रदुषण रोखण्यासाठी स्थानिक परीस्थितीनुसार करावयाच्या उपाययोजना.

या योजनेतंर्गत सन २००७-०८ या आर्थिक वर्षात कागल नगरपरिषद, कागल यांचेमार्फत सादर श्रीमंत जयसिंगराव सरोवराचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

१. राज्य योजनेअंतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेत कागल नगर परिषदेने कागल शहरातील श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानूसार सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ मध्ये नमूद केलेली कामे पूर्ण करण्यासाठी या कामांकरीता एकूण रू. २,६०,४६,६६६.७२ (अक्षरी दोन कोटी साठ लाख सेहचाळीस हजार सहाशे सहासष्ट रूपये बहात्तर पैसे) इतक्या रकमेस सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब मधील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. मंजूर निधी रूपये २,६०,४६,६६६.७२ (अक्षरी दोन कोटी साठ लाख सेहचाळीस हजार सहाशे सहासष्ट रूपये बहात्तर पैसे) एवढया रकमेपैकी राज्य शासनाकडून ७० % हिस्स्यापोटी रू. १,८२,३२,६६६.७० (अक्षरी एक कोटी ब्याऐंशी लाख बत्तीस हजार सहाशे सहासष्ट रूपये सत्तर पैसे ) एवढी रक्कम अनुदान म्हणून कागल नगरपरिषदेस मंजूर करण्यास प्रशासकीय मान्यता

२. देण्यात येत आहे. उर्वरीत ३० % हिस्सा म्हणजेच रूपये ७८१४०००.०२ (अक्षरी अठठ्यात्तर लाख चौदा हजार रूपये दोन पैसे) एवढी रक्कम नगरपरिषदे चा ३०% हिस्सा म्हणून कागल नगर परिषद उपलब्ध करून देईल.

३. उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार कागल नगरपरिषदेच्या हद्दीतील श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या उपरोक्तनुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून पहिल्या टप्प्यातील कामांकरीता खालील प्रमाणे एकूण रूपये १००,००००० (अक्षरी शंभर लाख रूपये )एवढया निधीचे अनूदान कागल नगरपरिषदेस वितरीत करण्यास व सदरची रक्कम खर्च करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी -देण्यात येत आहे.

४. यासाठी मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद, कागल जिल्हा कोल्हापूर (CHIEF OFFICER, KAGAL NAGARPRISHAD, KAGAL)यांच्या नावे रू.१०० लाख एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.

५. हा होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण -०४-पदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३ वायु व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना - (३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा यावा व तो सन २००७-२००८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर निधीचे वितरण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००६/ प्र.क्र. १३१/कोषा प्रशासन-५ दिनांक १५ मे २००७ अन्वये या विभागास अर्थसंकल्पीत तरतूद वितरीत करण्यास दिलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www. maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २००७०९२९१०३५५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्या.ना.धकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१०. वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प - ५, मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
१५. मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद कागल जि.कोल्हापूर

१६. निवड नस्ती, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

| Annexure -A<br>(Cost Estimates) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Item** | **Quantitative Estimate** | **Rate** | **Cost Rs.** | **Remarks** |
| **1.** | **CORE SCHEMES** | | | | |
| **(A)** | **In-situ cleaning** | | | | |
| | (i) De-weeding | | | | |
| | | I) Cost for Removal of emergent and submerged plants and other aquatic weeds from the Lake body & Removal of submerged aquatic weeds, bushy plants along the periphery of the Lake & from the marshy pockets along the Lake boundary disposal of the same on dumping ground at Municipal Solid Waste Disposal Site. | 8 Acres @ Rs. 15,000/- per Acre | 1,40,000/- | From Lake Body & Periphery- Manual Cleaning |
| | | | **Total** | **1,40,000/-** | |
| | (ii) De-silting (Wet & Dry) | 1) Cost of Removing Sludge & Sediments from the Lake Body by Environmental Dredging in wet condition.<br><br>4) Cost of Removing Sludge & Sediments from the Feeders | 80000 $M^3$<br><br>10,000 $M^3$ @ Rs.52.30 /- per $M^3$ | 67,20,000/-<br><br>5,23,000/- | Wet Desilting Area of Desilting Reduced to 35 Acres from 50 Acres.<br><br>Sludge & silt removal from the lake' will used to strengthen the lake wall |
| | | | **TOTAL** | **7243000/-** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(B)** | Prevention of the lake water and feeder canal water contamination by night soil due to open deification practices by nearby residents, dung, animal wastes and animal washing activities by farmers and local villagers and industrial establishments in immediate vicinity at the MIDC area as well as Cost of treatment of Lake body and Lake peripherals | i) 'Horizontal Roughing Filter (HRF) & Bio-Phyto Remediation in feeders' channel<br><br>ii) LCS<br><br>iii) Circulator Mill Equipment for aeration (Little River Pond Mill)<br><br>iv) Procurement of FRP mechanical propeller boat | ------<br><br>3 Units @ Rs.2,00,000/- per Unit<br><br>3 Nos @ Rs.6,00,000/- per Unit<br><br>1 No. @ Rs.2,50,000/- per No. | 5,00,000/-<br><br>6,00,000/-<br><br>18,00,000/-<br><br>2,50,000/- | <br><br><br><br>**Revised Cost** |
| | | | **TOTAL** | **31,50,000/-** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(C)** | Lake body and catchment demarcation, its treatment and development through shelterbelt plantation and mass afforestation as well as preparation of a buffer zone, provision of constructed wetlands to arrest, treat / prevent pollution ingress in to the lake from nearby localities & fast growing Kagal – Hatkanangale Five Star MIDC area on northern and northeastern sides of the lake. (Mass afforestation, Shelter belt Plantation, Buffer Zone/ Constructed wet land ) | This item would include catchment treatment and development which would comprise of counter bunding, shelterbelt plantation (3 km), mass afforestation with select plant species ( 30 acers) and rain water harvesting measures as well as provision of a buffer zone ( 20 acres) between lake's boundary and the fast growing Kagal – Hatkanangale Five Star MIDC area on Northern and North-Eastern sides of the lake and a constructed wet land. | ------- | **40,00,000/-** | Catchment treatment & development. |
| **(D)** | **Lake's Infrastructure** | **Main Lake Embankment top straightening**<br><br>**Intake Well & Allied Structures up-gradation and cleaning of waste weir U/S area, Waste weir repair** | | 67,02,044/-<br><br>5,30,000/- | |
| | | | **TOTAL** | **72,32,044/-** | |
| **2.** | NON CORE SCHEMES | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(E)** | **Demarcation of Lake Boundaries**<br>(i) Barbed Wire fencing & Gates | 6 KM barbed wire fencing and<br>Providing MS Grill Gates | Rs. 246.75/- per RMT<br>56 $M^2$ @ Rs. 1102.50 per $M^2$ | 14,80,500/-<br><br>61,740/- | |
| | | | **Total** | **15,42,240/-** | |
| | B) General Beautification & Developmental Works | i) Development of Hillock (Bird Habitat) | | 2,00,000/- | |
| | | | **Total** | **200000/-** | |
| **F** | **Environmental Awareness and Public Participation** | | ------ | **1,50,000/-** | |
| **G** | **Water Quality Monitoring ( EPA LAB)** | Analysis would be done for<br>i) Physico-Chemical Analysis of the Water Samples.<br>ii) Chemical Analysis of Lake Bottom Sludges<br>iii) Biological Analysis<br>iv) Bacteriological Analysis of the Lake Water | 120 samples @ Rs.2000 per sample<br>60 Samples @ Rs. 2000 per sample<br>72 Samples @ Rs. 2400 per sample<br>72 Samples @ Rs. 1800 per sample | 2,40,000/-<br>1,00,000/-<br>1,72,800/-<br>1,00,600/- | |
| | | | **Total** | **6,00000/-** | |
| | **Core + Non Core** | | | **24117284** | |
| | **Centage Charges @ 8% ( includes technical sanction fees, constancy and project monitoring fees)** | | | **1929382.72** | |
| | **GRAND TOTAL** | | | **26046666.72** | |
| | **Share of State (70%)** | | | **18232666.704** | |
| | **Local Body ( 30%)** | | | **7814000.016** | |

.

**परिशिष्ट - ब**

राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत कागल नगरपरिषदेच्या श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या कामांसाठीच्या अटी व शर्ती.

१. तलाव संवर्धन क्षेत्रात तज्ञ व कामाचा अनुभव असलेली तसेच परिशिष्ट - अ नुसार मंजूर खर्चाच्या बाबी संबधीत तज्ञ व पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ असलेली संस्था / शासकीय प्राधिकरण / मंडळ यांची प्रथमतः प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था म्हणून कागल नगरपरिषदेने विहीत पध्दतीने नियूक्ती करणे आवश्यक आहे. ही संस्था परिशिष्ट-अ नुसार मंजूर खर्चाच्या बाबींचे स्थानिक डी.एस.आर.प्रमाणे खर्चाचे अंदाज, कामाचे आराखडे तयार करणे व तपासणे कामाची गुणवत्ता राखणे, सर्व कामे विहीत कालमर्यादेत पुर्ण करणे याबाबत वेळोवेळी समन्वय करेल. तथापि कामे विहीत कालावधीत पुर्ण करण्याची व कामाची गुणवत्ता राखण्याची संपुर्ण जबाबदारी ही कागल नगरपरिषद व संबधित मुख्याधिका-यांची असेल. मंजूर प्रत्येक टप्प्यातील कामांना सुरवात करण्यापूर्वी पर्यावरण विभागास अवगत करण्यात यावे. नगरपरिषदेने स्वतंत्र तात्रिक मनुष्यबळ प्रकल्पासाठी तयार होण्यासाठी या समितीचा उपयोग करणे आवश्यक आहे.

लोकसहभाग व पर्यावरण जनजागृती कार्यक्रमांविषयी प्रथमतः पर्यावरण विभागास सूचित करण्यात यावे.

२. प्रकल्पाची यथायोग्य अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प सनियंत्रण समिती मुख्याधिकारी नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात यावी. या समितीत नगरपरिषदेतील संबधित अधिकारी, कर्मचारी, उपरोक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी यांच्यासह नगरपरिषदेस आवश्यक वाटतील त्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. ही समिती प्रकल्पांतर्गत होत असलेल्या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करेल. सदर समितीची बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या मदतीशिवाय तलावाचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने पूर्ण झाल्यावरही बैठका आयोजित करेल. ही समिती भौतिक बाबींची देखभाल प्रकल्पांपासून मिळाणारे उत्पन्न, प्रकल्प संवर्धनासाठी उपाययोजना व खर्च याबाबत आढावा घेत राहील.

३. तलावाच्या पाण्याची गुणवत्ता चालू महिन्यापासून पुढे प्रत्येक महिन्याला तपासण्यात यावी. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रयोगशाळेची / संस्थेची / मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. दर महिन्याचा पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल सदर संस्था प्रकल्प सनियंत्रण समितीस सादर करेल.

४. उक्त नमूद तीन मुद्दयानुसार केलेल्या कार्यवाही प्रमाणे मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद हे शासनास दर तीन महिन्याला खालील अहवाल सादर करतील

i ) मंजूर कामांचा भौतिक प्रगती अहवाल

ii) पाण्याच्या गुणवत्ता अहवालाच्या प्रती

iii) प्रकल्प सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

iv ) खर्चाचे प्रत्येक तिमाहिचे उपयोगिता प्रमाणपत्र.

सदर अहवाल सादर केल्याशिवाय कामाच्या पुढील टप्प्यातील निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच आर्थिक वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर एप्रिलच्या ५ तारखेपर्यंत पर्यावरण विभागास सादर करावे.

५. योजनेतंर्गत मंजूर विशिष्ट कामासाठी अदा केलेली वा मान्य केलेली रक्कम त्याच कामासाठी राज्य शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे व विहीत कालमर्यादेत मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी इतर दुस-या कोणत्याही कामासाठी वा नगरपरिषदेच्या कामासाठी वापरता येणार नाही किंवा वळता करता येणार नाही. विशिष्ट कामासाठी मान्य केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबधित मुख्याधिकारी व नगरपरिषद याची असेल.

६. या योजनेतंर्गत प्राप्त होणारा निधी हा राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र खाते उघडून त्या अंतर्गत जमा करावा व बॅकेत ठेवलेल्या निधीवर मिळणारे व्याज याच निधीत जमा करावे. या निधीच्या उपयोगितेवर नियंत्रण राहण्यासाठी खात्याचे संचालन संबंधीत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याद्वारे करण्यात यावे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतेवेळी बँकेतील या खात्यावर झालेल्या व्यवहाराच्या नोंदी दर्शविणा-या पासबुकाची साक्षांकित प्रत सोबत जोडण्यात यावी.

७. योजना पूर्ण झाल्यावर या योजनेंतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेपासून किंवा सोयीसुविधांपासून मिळणारे उत्पन्न हे या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यातच जमा करण्यात यावे. या उत्पन्नातून तलाव संवर्धनासाठी अतिरिक्त कामे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने हाती घेता येतील. मात्र तलावाच्या संवर्धनाच्या कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी हा महसूली निधी वापरता येणार नाही.

८. ही कामे शासन आदेशाच्या दिनांकापासुन ३६ महीन्यात किंवा तत्पुर्वी पुर्ण करावयाची आहेत.

९. मंजूर बाबीतील खर्चामध्ये बचत झाल्यास बचत झालेला निधी योजनेतीलच दुस-या उपांगासाठी राज्य शासनाच्या पर्यावण विभागाच्या परवानगीने तो वापरता येईल.

१०. राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत निर्माण केलेल्या यंत्रणेच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च योजना कार्यान्वयीत झ ाल्यानंतर संबंधीत नगरपरिषदेने स्वतःच्या निधीतून भागवावयाचा आहे.

११. योजनेतंर्गत खर्च करण्यात येणा-या रकमेचे लेखे नगरपरिषद लेखा संहितेनुसारच ठेवण्यात यावेत व त्याचे लेखापरिक्षण स्थानिक निधी व लेखापाल यांच्याद्वारे करण्यात यावे व त्याचा अहवाल पर्यावरण विभागास पाठविण्यात यावा.

१२. तलावाच्या कामांच्या प्रगतीच्या अहवालाची तसेच खर्चाच्या विवरणपत्राची पर्यावरण विभागाच्या सक्षम अधिका-याकडून तपासणी करण्यात येईल व तपासणीच्या वेळी नगरपरिषदेणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधन कारक असेल.

१३. संबंधीत नगरपरिषदेच्या हद्दीतील हॉटेलमधून / लोकवस्तीतून / वाणिज्यिक आस्थापनेतून निघणारे सांडपाणी तलावात जाणार नाही याची जबाबदारी संबंधीत नगरपरिषदेवर असेल.

१४. योजनेवरील कामासाठी मान्यता प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च झालेली रक्कम शासनाकडून उपलब्ध होणार नाही. या कामासाठी शासनाने अदा केलेली रक्कम जर त्या कामावर घालून दिलेल्या विविक्षित वेळेमध्ये खर्च होऊ शकत नसेल तर त्यास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल..

१५. योजनेवरील कामासाठी अदा केलेली रक्कम योग्यरितीने वापरली जात नाही किंवा कामाची योग्य ती प्रगती होत नाही असे शासनाच्या निदर्शनास आल्यास शासन कोणत्याही क्षणी अशा कामांची प्रशासकीय मान्यता रद्दबातल करू शकेल.

१६. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या परवानगी शिवाय तलावात बोटींगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तसेच यांत्रिक बोटींचा वापर तलावात कुठल्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय असणार नाही. फक्त पॅडल बोटचा वापर अनुज्ञेय असेल.

१७. तलावात मत्स्यमारी शक्यतो करण्यात येवू नये. मत्स्यमारी करावयाची झाल्यास फक्त मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यासाठी परवानगी देण्यात यावी. अशावेळी १० इंच व त्यापेक्षा लहान आकाराच्या माशांना पकडण्याची मुभा देण्यात येवू नये. स्थानिक परिस्थितीनूसार याबाबत प्रकल्प सनियंत्रण समिती वेळोवेळी निर्णय घेईल.

१८. योजनेवरील कामांसाठी राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरीक्त शासनाकडून, वित्तीय संस्थाकडून वा आणखी कोणत्याही संस्थाकडून प्राप्त निधी या योजने अंतर्गत खर्च झाल्याचे दर्शविण्यात येवू नये. (No Overlaping of schems)

१९. योजनेचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्यासाठी भेट देणा-या राज्य शासनाच्या अधिका-यांस आवश्यक त्या सर्व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.

२०. योजनेतंर्गत शासनाच्या अनुदानातून तयार केलेली मालमत्ता, ज्या कामासाठी निर्माण केली आहे. त्याच कामासाठी वापरणे आवश्यक आहे व त्यासाठी ही मालमत्ता अभिलेखित करणे आवश्यक आहे.

२१. योजनेतंर्गत करण्यात येणा-या निरनिराळया कामांचे व समन्वयाचे काम राज्य स्तरावरील सनियंत्रण समितीव्दारे करण्यात येते. या समितीने कामाबाबत वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

२२. योजनेतंर्गत नगरपरिषदेच्या होणा-या आस्थापनेवरील व लागणा-या मनुष्यबळावरील खर्च संबंधीत नगरपरिषदेद्वारे करण्यात येईल. यासाठी या विभागाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

२३. योजनेतंर्गत तलावातून काढण्यात येणा-या गाळाचे अभिलेख व छायाचित्रासह पुरावे नगरपरिषदेने जतन करावेत. तसेच गाळाच्या विल्हेवाटीची अभिलेखामध्ये नोंद करून ठेवावी.

२४.राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे व शर्तींचे पालन करणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

२५.योजनेतंर्गत किती लोकांना रोजगार उपलब्ध झाला याची नोंद ठेवावी.

२६.योजना कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असल्याने योजने करीता कोणतेही एस्कलेशन चार्जेस अनुज्ञेय नाहीत.

२७.योजनेतर्गत मंजूर कामांच्या निविदा हया प्रकल्पातंर्गत मंजूर किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या स्विकारण्यात येऊ नयेत.

२८.कॉन्ट्रक्टरने विहीत वेळेत काम पुर्ण न केल्यास त्यांच्यावर दंडाची तरतूद ठेवण्यात यावी.

२९.योजनेतंर्गत झालेल्या सर्व खर्चाचा ताळमेळ वेळोवेळी अधिदान व लेखाअधिकारी कार्यालय, मुंबई व तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयाशी घालण्याची जबाबदारी संबधीत नगरपरिषदेची असेल.

३०.योजना पुर्ण झाल्यावर भविष्यात तलावाच्या उपयोगाबाबत व वापराबाबत किंवा तलावासंदर्भात कोणतीही नविन कामे हाती घ्यावयाची झाल्यास त्यास प्रथम राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात यावी.